दैनिक
अचूक वेध,अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
वर्ष : ०४, अंक : १०१
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com
बुलडाणा, शनिवार, दि.२३ नोव्हेंबर २०२४

“यशस्वी होण्यासाठी तुमची यशस्वी होण्याची इच्छा अपयशी होण्याच्या भीतीपेक्षा अधिक प्रबळ असली पाहिजे.”

## विधानसभा निवडणूक निकालानंतर शरद पवार महायुतीशी हात मिळवणार?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, मुंबई :** महाराष्ट्राची विधानसभा निवडणूक पार पडली आहे. आता सगळ्या महाराष्ट्राला प्रतीक्षा आहे ती निकालांची. महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकालामध्ये कुणाची सरशी होणार? हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे. निवडणूक पार पडल्यानंतर जे एक्झिट पोल समोर आले आहेत त्यांनी महायुतीची सत्ता येईल असं म्हटलं आहे. तर दोन ते तीन एक्झिट पोल्सनी महाविकास आघाडीची सत्ता येईल असं म्हटलं आहे. काय होतं ते २३ नोव्हेंबरला समजणार आहे. दरम्यान भाजपाचे खासदार आणि ज्येष्ठ नेत्याने शरद पवार महायुतीसह येऊ शकतात असा दावा केला आहे. त्यानंतर आता नेमकं काय होणार याची चर्चा सुरु झाली आहे.



**महाराष्ट्रात महायुती विरुद्ध महाविकास आघाडीचा सामना**

महाराष्ट्रात महायुती विरुद्ध म हाविकास आघाडी असा थेट सामना पार पडला आहे. या सामन्यात विजयी कोण होणार? याचा निकाल २३ नोव्हेंबरला म्हणजेच आता काही तासांमध्येच लागणार आहे.

त्यामुळे या निकालाकडे महाराष्ट्राचं लक्ष लागलं आहे. महाराष्ट्रात महायुतीचं सरकार हे महाविकास आघाडीचं सरकार पडल्यानंतर आलं आहे. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना या दोन्ही पक्षांना खिंडार पडलं आहे. यानंतर जी लोकसभा निवडणूक पार पडली त्यात महाविकास आघाडीला यश मिळालं. तर विधानसभा निवडणुकीचा निकाल लागण्यासाठी काही तास उरले आहेत. अशातच भाजपाच्या ज्येष्ठ नेत्याने शरद पवारही महायुतीसह येऊ शकतात असा दावा केला आहे.

**नारायण राणे काय म्हणाले आहेत?**

शरद पवार धूर्त नेते आहेत. कुठल्याही क्षणी त्यांच्या पक्षाच्या आमदारांच्या हिताचा निर्णय शरद पवार घेऊ शकतात. असं नारायण राणे यांनी म्हटलं आहे. विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांना रस्त्याने चालणं कठीण होईल. संजय राऊत यांनी शिवसेनेची वाट लावली. आता शिवसेनेचं पूर्वीसारखं वर्चस्व राहिलेलं नाही. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना फक्त दोन दिवस मंत्रालयात गेले, अशी टीकाही नारायण राणे यांनी केली आहे. एबीपी माझाला दिलेल्या मुलाखतीत नारायण राणेंनी हे वक्तव्य केलं आहे.

**महायुतीला लोकांनी कौल दिला आहे**

महायुतीला लोकांनी कौल दिला आहे, लोकांना हेच वाटतं आहे की महायुतीचं सरकार आलं पाहिजे. म हाविकास आघाडीचं सरकार आल्यानंतर जे मुख्यमंत्री होते आणि जे मंत्री होते त्या सराकारने महाराष्ट्राला मागे घेऊन जाण्याचं काम केलं. विरोधकांवर टीका, वागणूक वाईट देणं, सूडाचं राजकारण करण्यात आलं. मात्र महायुतीचं सरकार तसं नाही. महाराष्ट्रात एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी चांगलं काम केलं आहे. महाराष्ट्रात जातीय दंगली, तेढ, प्रक्षोभ निर्माण झाला नाही. त्यामुळे महायुतीचं सरकार येईल असं मला वाटतं असं नारायण राणे यांनी म्हटलं आहे.

## मतमोजणीसाठी जिल्हा प्रशासन सज्ज; पोलिसांचा चोख बंदोबस्त

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, वाशिम :** ३३ रिसोड, ३४ वाशिम आणि ३५ कारंजा या विधानसभा मतदारसंघाच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी दिनांक २० नोव्हेंबर रोजी मतदान झाले असून मतमोजणी शनिवार, दिनांक २३ नोव्हेंबर रोजी होणार आहे. मतमोजणीसाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले असून पोलीस बंदोबस्तात होणाऱ्या मतमोजणीतून ३ विधानसभेच्या ६२ उमेदवारांच्या भाग्याचा फैसला होणार आहे. प्रत्येक विधानसभा क्षेत्रासाठी १४ टेबल असणार आहे.

मतमोजणी ठिकाण याप्रमाणे – ३३-रिसोड विधानसभा मतदारसंघ येथील मतमोजणी तहसील कार्यालय, ३४-वाशिम विधानसभा मतदारसंघ येथील मतमोजणी कोरोनेशन क्लब हॉल , ३५-कारंजा विधानसभा मतदारसंघ येथील मतमोजणी कृषी उत्पन्न बाजार समिती परिसर येथे होणार आहे.



**मतमोजणीच्या फेऱ्या याप्रमाणे –** विधानसभेच्या मतमोजणीस त्या-त्या ठिकाणी सकाळी ८ वाजता सुरुवात होणार असून मतदारांच्या संख्येनुसार फे-या होणार आहेत. यात ३३ रिसोड २५ फेऱ्या, ३४ वाशिम २८ फेऱ्या व ३५ कारंजा २६ फेऱ्या होणार आहे. या मतमोजणीत टपाली मतदानाची ईव्हीएम व ईटीपीबीएस च्या मतांची मोजणी होईल. मतमोजणीसाठी तीन ही विधानसभा मतदारसंघात प्रत्येक टेबलवर प्रत्येकी एक कोतवाल, मतमोजणी अधिकारी, पर्यवेक्षक व सूक्ष्म निरीक्षकाची नियुक्ती करण्यात आली असून जिल्हा प्रशासन सज्ज झाले असल्याची माहिती जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी बुवनेश्वरी एस यांनी दिली. जिल्ह्यातील ३ विधानसभा मतदारसंघांमध्ये २० नोव्हेंबर रोजी झालेल्या मतदान प्रक्रियेत ६७.०९ टक्के मतदानाची नोंद झाली. दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक आणि युवकांनी उत्साहाने मतदान करून लोकशाही प्रक्रियेत सहभाग नोंदवला.

## मतमोजणी केंद्र परिसरात मनाई आदेश...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, छत्रपती संभाजीनगर :** विधानसभा निवडणूक २०२४ करीता शनिवार, दि.२३ रोजी मतमोजणी होणार आहे.

**विधानसभा मतदार संघनिहाय मतमोजणी केंद्राचे ठिकाण याप्रमाणे –**

**१०४- सिल्लोड-** शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर जळगाव हायवे, सिल्लोड ता. सिल्लोड. जि. छत्रपती संभाजीनगर.

**१०५- कन्नड-** इनडोअर हॉल, शिवाजी महाविद्यालय, कन्नड, ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर.

**१०६-फुलंब्री-** गरवारे हायटेक फिल्म्स लि. चिकलठाणा एमआयडीसी, छत्रपती संभाजीनगर.

**१०७-औरंगाबाद (मध्य)-** शासकीय तंत्रनिकेतन , रेल्वेस्टेशन रोड, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर.

**१०८-औरंगाबाद(पश्चिम)-** शासकीय अभियांत्रिकी विद्यालय, रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर.

**१०९-औरंगाबाद(पूर्व)-** सेंट फ्रान्सीस डी सेल्स हायस्कूल, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर.

**११०- पैठण-** प्रशासकीय इमारत, संतपीठ, जायकवाडी धरणाजवळ, पैठण, ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर.

**१११-गंगापूर-** इनडोअर स्टेडियम हॉल, श्री मुक्तानंद महाविद्यालय, गंगापूर, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर.

**११२-वैजापूर-** टेनिस कोर्ट हॉल, विनायक पाटील महाविद्यालय, येवला रोड, वैजापूर ता. वैजापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

मतमोजणी शांततेत व्हावी यासाठी मतमोजणी केंद्राच्या १०० मीटर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्म क आदेश लागू करण्यात आले आहे. त्याअन्वये मतमोजणी केंद्राच्या १०० मीटर परिसरात प्राधिकृत व्यक्तिंव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तिस प्रवेश करण्यास, मोबाईल नेण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. हे आदेश मतमोजणी अधिकारी, कर्मचारी, पोलीस अधिकारी यांना लागू राहणार नाहीत, असे स्पष्ट करण्यात आले आहे. संपूर्ण परिसरात मोबाईल, टॅब, संगणक व तत्सम संदेशाची देवाणघेवाण करणाऱ्या विद्युत उपकरणे बाळगण्यास व हाताळण्यास मनाई, अनधिकृत व्यक्तिच्या प्रवेशास मनाई करण्यात आली असून या आदेशाचा भंग करणाऱ्या व्यक्तिविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ प्रम णे कारवाई करण्यात येईल, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

## घाटकोपरमध्ये मोटार गाडीच्या अपघातात २ पोलीस जखमी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, मुंबई :** मानखुर्द-घाटकोपर लिंक रोडवरील छेडा नगर परिसरातून शुक्रवारी पहाटे जात असलेल्या कंटेनरला चालकाने अचानक ब्रेक लावल्याने म ागून आलेली पोलीस मोटारगाडी त्यावर आदळली. या अपघातात दोन पोलीस जखमी झाले असून त्यांच्यावर राजावाडी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हा अपघात शुक्रवारी पहाटे ५ च्या सुमारास मानखुर्द-घाटकोपर लिंक रोडवरील छेडा नगर परिसरात घडली. चेंबूरच्या टिळक नगर पोलीस ठाण्याचे काही कर्मचारी गस्त घालण्यासाठी छेडा नगर परिसरात जात होते. यावेळी अचानक थांबलेल्या कंटेनर पोलिसांची गाडी आदळली. या अपघातात टिळक नगर पोलीस ठाण्याचे पोलीस शिपाई जगदीश पाटील आणि साहिल खामकर जखमी झाले. त्यांच्यावर राजावाडी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याबाबत टिळक नगर पोलिसांनी कंटेनर चालक बिपीन सिंह (२२) याला ताब्यात घेतले असून याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.




## उमेदवारांसह कार्यकर्त्यांची धाकधूक वाढली ! आजच्या मतमोजणीकडे लागल्या सर्वांच्या नजरा...

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२२, अहिल्यानगर :** बुधवारी विधानसभेची निवडणूक पार पडल्यानंतर राज्यातील सर्वच उमेदवार व कार्यकर्त्यांचे शनिवारी होणार्या मतमोजणीकडे लक्ष लागल्याने उमेदवार व कार्यकर्त्यांची धाकधूक वाढली असून कोणता उमेदवार विजयी होणार, कोणाला किती मताधिक्य मिळणार, राज्यात कुणाचे सरकार येणार, कोणाचा पराभव होणार याची चर्चा ग्रामीण बरोबर शहरी भागात रंगल्याचे दिसत असून आजच्या २३ नोव्हेंबर रोजी होणार्या मतमोजणीकडे नागरिकांच्या नजरा लागल्या आहेत. गेल्या पंधरा दिवसांपासून संपूर्ण राज्यात विधानसभेच्या निवडणुकीने राजकीय वातावरण चांगले ढवळून निघाले होते. निवडणुकीच्या आखाड्यात आपला प्रतिस्पर्धी असलेला उमेदवार आपल्यापेक्षा कसा कमकुवत आहे व आपण त्यापेक्षा राजकीयदृष्ट्या कसे ताकतवर आहेत हे दाखवून देण्यासाठी राज्यातील विधानसभा निवडणुकीसाठी विविध पक्षाकडून निवडणुकीच्या रिंगणात उभ्या असलेल्या उमेदवारांनी प्रचार दरम्यान एकम कांवर आरोपांच्या फैरी झडत वातावरण चांगलेच तापून टाकल्याचे बघायला मिळाले. निवडणुकीदरम्यान पंधरा दिवस देशातील सर्वच पक्षाच्या प्रमुख नेत्यांनी सभा घेऊन मतदारांनी आपल्या पक्षाच्या उमेदवारांना निवडून देण्यासाठी त्यांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला.

सभेला मोठ्या प्रमाणात गर्दी खेचण्यासाठी मजुरी करणार्या व्यक्तींना या निवडणुकीत चांगलाच डिमांड आल्याचे दिसून आले. परिणामी शेती व इतर ठिकाणी मजुरीसाठी मनुष्यबळ मिळत नसल्याचे दिसून आले. विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांना प्रचार करण्यासाठी अवघे पंधरा दिवस मिळाल्याने उमेदवारांबरोबरच कार्यकर्त्यांना प्रत्येक मतदारांपर्यंत पोहचण्यासाठी मोठी दमछाक करावी लागली. त्यामुळे कधी एकदाची २० नोव्हेंबर तारीख येईल व निवडणूक पार पडेल असे उमेदवारांच्या चेहऱ्यावर दिसत होते. निवडणूकी दरम्यान प्रत्येक गावात शाकाहारी व मांसाहारी असणाऱ्या हॉटेलमध्ये कार्यकर्त्यांची गर्दी बघायला मिळाली. अखेर बुधवारी महिला व पुरुषांनी उत्स्फूर्त पद्धतीने मतदान करत आपला मतदानाचा हक्क बजावला. निवडणूकीची धामधूम २० नोव्हेंबर रोजी संपली मात्र उमेदवार व कार्यकर्त्यांचे लक्ष आता आजच्या २३ नोव्हेंबर मतमोजणीच्या निकालाकडे लागले आहे. या निवडणुकीत आपला विजय व्हावा यासाठी अनेकांनी देवाकडे साकडे घातले तर काही ठिकाणी पैजा लागल्या आहेत. अनेक उमेदवार देवदर्शनासाठी गेले आहेत. बुधवारी सायंकाळी निवडणूक संपल्यानंतर गुरुवारी सकाळी कोणता उमेदवार निवडून येईल निवडून आलेल्या उमेदवाराला किती मताधिक्य असेल कोणाला पराभवाचा सामना करावा लागेल, राज्यात कोणाचे सरकार येईल, कोणत्या कार्यकर्त्यांनी निवडणुकीत काम केले व केले नाही याची चर्चा आता सर्वत्र सुरू होती. संपूर्ण राज्यात शहरासह ग्रामीण भागात गुरुवारी सकाळपासूनच नागरीकांमध्ये २३ तारखेच्या मतमोजणीकडे लक्ष लागले असून उमेदवार व कार्यकर्त्यांची देखील निकालाकडे लक्ष लागल्याने धाकधूक वाढल्याचे बघायला मिळते आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांनी केली मतमोजणीच्या तयारीची पाहणी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, छत्रपती संभाजीनगर :** विधानसभा निवडणूक २०२४ करीता शनिवार, दि.२३ रोजी मतमोजणी होणार आहे. मतमोजणी केंद्रावर निवडणुक आयोगाने दिलेल्या निर्देशांप्रमाणे सर्व तयारी करण्यात आली आहे. आज दुपारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी १०७-औरंगाबाद मध्य, १०८-औरंगाबाद पश्चिम,१०९-औरंगाबाद पूर्व या विधानसभा मतदार संघांच्या मतमोजणी केंद्रांना भेटी देऊन पाहणी केली. १०७-औरंगाबाद (मध्य) चे मतमोजणी केंद्र शासकीय तंत्रनिकेतन , रेल्वेस्टेशन रोड, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर, १०८-औरंगाबाद(पश्चिम)चे मतमोजणी केंद्र शासकीय अभियांत्रिकी विद्यालय, रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर, तर १०९-औरंगाबाद (पूर्व)-सेंट फ्रान्सीस डी सेल्स हायस्कूल, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर या केंद्रांना त्यांनी भेटी दिल्या. संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून मतमोजणी केंद्राची रचना, तेथील सुरक्षा व्यवस्था, माध्यम कक्ष, टपाली मतांच्या मोजणीची व्यवस्था, स्ट्राँग रुम, मतदान यंत्रांची स्ट्राँग रुम ते मतमोजणी कक्ष अशी केली जाणारी वाहतुक अशा विविध बाबींची पाहणी केली. त्याचप्रमाणे मतमोजणी केंद्राकडे येणारे व तेथून बाहेर जाणारे मार्ग, त्यावरील सुरक्षा व्यवस्था इ. बाबींची पाहणी केली.

## कूपर रुग्णालयात महिला रुग्णाने मारली सहाव्या मजल्यावरून उडी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, मुंबई :** मूत्राशयाचा त्रास होत असल्याने गुरुवारी रात्री रुग्णलयात उपचारासाठी दाखल झालेल्या ३९ वर्षीय महिलेने शुक्रवारी पहाटे सहाव्या मजल्यावरून उडी मारली. या प्रकरणी सखोल चौकशीचे आदेश रुग्णालय प्रशासनाने आदेश दिले आहेत. तसेच रुग्णालय प्रशासनाकडून पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली आहे.

जोगेश्वरी येथे राहणारी रबिया खानला (३९) मूत्राशायाचा त्रास होत असल्याने तिला गुरुवारी रात्री १० वाजता रुग्णालयात आणण्यात आले. डॉक्टरांनी तिला रुग्णालयात दाखल करून घेतले. मात्र शुक्रवारी सकाळी ६ वाजल्यापासून ती रुग्ण कक्षातून गायब झाली होती. त्यामुळे तिचा रुग्णालयात सर्वत्र शोध घेण्यात येत होता. दरम्यान, सकाळी ८.३० वाजताच्या सुमारास ती इमारतीच्या मागील बाजूस असलेल्या फायर फायटिंग डक्टजवळ पडलेली आढळली. डॉक्टरांनी तिला तपासल्यानंतर तिचा मृत्यू झाल्याचे जाहीर केले. तिचे शवविच्छेदन केल्यानंतर तिच्या डोक्याला मार लागल्याने, तसेच शरीरावर ठिकठिकाणी दुखापत झाल्याने तिचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले. कूपर रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर मेढेकर यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी त्रिसदस्यीय समिती नेमली आहे. तसेच या प्रकरणी पोलीस ठाण्याम ध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अक्षराज

२ | बुलडाणा, शनिवार, दि.२३ नोव्हेंबर २०२४ | विविधा


## संपादकीय



### पोलीस आणि त्यांच्याबद्दल गैरसमज

पोलीस आपल्या समाजाचा एक अविभाज्य भाग आहेत. त्यांचं मुख्य काम कायदा आणि सुव्यवस्था राखणं, नागरिकांचं रक्षण करणं, आणि गुन्हेगारी थांबवणं आहे. पण तरीही, पोलीसांबद्दल अनेक गैरसमज आणि चुकीच्या धारणा समाजात आढळतात. पोलीस म्हणजे भ्रष्टाचारीच असतात हे सर्वसामान्य गैरसमज आहे. काही अपवाद असू शकतात, पण बहुतांश पोलीस कर्मचारी प्रामाणिक असतात. ते आपल्या कुटुंबांपासून लांब राहत, कमी संसाधनांमध्ये, अतोनात ताण सहन करत, नागरिकांसाठी दिवस-रात्र काम करतात.

पोलीस नेहमी कठोर असतात असे अनेकांना वाटतं की पोलीस हे फक्त कठोर, रागीट किंवा त्रास देणारे असतात. पण पोलीस काम करताना परिस्थितीनुसार वागतात. गुन्हेगारांना आवर घालण्यासाठी कधी कधी कठोरता आवश्यक असते, पण सामान्य लोकांसोबत ते सहृदयपणे वागतात.

पोलीस मदत करत नाहीत असे काहीवेळा नागरिकांना वाटतं की पोलीस त्यांची तक्रार गंभीरतेने घेत नाहीत. पण पोलीस आपल्या कामासाठी प्रोटोकॉल आणि नियमांमध्ये अडकलेले असतात. त्यांच्या हातात असलेल्या मर्यादांमुळे सर्व तक्रारींवर त्वरित काम करता येत नाही.

पोलीस फक्त अधिकारांचा गैरवापर करतात हा मोठा गैरसमज नागरिकांमध्ये आहे. पोलीसांना दिलेले अधिकार हे समाजासाठी आहेत. काहीजण या अधिकारांचा गैरवापर करू शकतात, पण ही अपवादात्मक प्रकरणं असतात. अशा घटनांवर कारवाई करण्यासाठीही पोलीस यंत्रणा सज्ज असते. पोलीसांना माणुसकी कळत नाही असेही लोकांना वाटतं की पोलीस हे कठोर बनलेले असतात आणि त्यांना इतरांच्या भावना कळत नाहीत. पण पोलीस हेही आपल्यासारखेच सामान्य माणूस आहेत. तेही कुटुंबासाठी झगडतात, त्यांनीही स्वप्नं पाहिलेली असतात. गैरसमज दूर करण्यासाठी पुढील उपाय केले जसेकी सकारात्मक संवाद नागरिकांनी पोलीसांशी चांगला संवाद साधायला हवा. एकमेकांच्या अडचणी समजून घेऊन गैरसमज टाळता येतात. पोलीसांवरील ओझं कमी करणं काही वेळा कामाचा ताण आणि मर्यादित साधनं यामुळे पोलीस योग्य प्रतिसाद देऊ शकत नाहीत. यावर उपाय म्हणून पोलीस दलाचं आधुनिकीकरण आणि अधिक मनुष्यबळ पुरवणं आवश्यक आहे. जवाबदारीचं भान पोलीसांनीही आपलं काम पारदर्शक आणि लोकाभिमुख पद्धतीने केल्यास नागरिकांचा विश्वास वाढेल. प्रशिक्षण आणि संवेदनशीलता पोलीसांना जनतेशी संवाद साधण्यासाठी आणि संवेदनशीलता जोपासण्यासाठी विशेष प्रशिक्षण दिलं पाहिजे. शेवटचा विचार पोलीस आणि नागरिक हे एकमेकांसाठी आहेत. गैरसमज दूर झाले, तर पोलीस लोकांच्या अधिक जवळ येतील, आणि समाज आणखी सुरक्षित आणि सुसंस्कृत बनेल.

# मावळत्या 'विधानसभेत' काय घडले-काय बिघडले ?

पुरोगामी महाराष्ट्रात राज्य स्थापन झाल्यानंतर १९६२ पासुन आजवर तेरा विधानसभा निवडणुका झाल्या, २०१९ साली १४ वी विधानसभा निवडणुक पार पडली ती चा कार्यकाळ २६ नोव्हेंबर रोजी संपत आहे आणि आता नवीन विधानसभा निवडणुकीसाठीचे मतदान देखील पार पडले आहे.२०१९ मधे ऑंक्टोबर महिन्यात निवडणूक पार पडली, निकाल लागले तात्कालिन भाजप शिवसेनेला स्पष्ट बहुमत मिळाले होते मात्र अनपेक्षितपणे बंद दरवाजा आड दिलेल्या शब्दावरून दोघांत बिनसले, सत्ता स्थापनेत विलंब होत असल्याने राज्यात राष्ट्रपती राजवट लागू झाली. जाणत्या राजांच्या मनात काही वेगळेच होते, संजय राऊत यांनी साहेबांना साथ दिली आणि शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस यांचे सरकार स्थापन करण्याच्या हालचाली सुरू झाल्या, मविआ चे सरकार स्थापन होणार आणि शिवसेनेचे ऊद्धव ठाकरे मुख्यमंत्री होणार हे जवळपास निश्चित झाले होते मात्र त्याच रात्री आणखी आश्चर्यकारकरीत्या घडामोडी घडल्या, एका रात्रीत राज्यपालांनी राष्ट्रपती राजवट ऊठवण्याची शिफारस केली, केंदाने मंजुरी दिली राष्ट्रपतींनी राष्ट्रपती राजवट ऊठवली, आणि सकाळ होता होताच पुन्हा एकदा महाराष्ट्राला धक्का बसला तो फडणवीस - अजितदादां च्या शपथविधीने.फडणवीस मुख्यमंत्री, अजितदादा ऊपमुख्यमंत्री दोघांचे सरकार केवळ ऐंशी तासांचे अल्पजीवी ठरले. अजितदादा साथीदारांसह माघारी फिरले आणि 'मविआ' चे सरकार स्थापन झाले. वाटले होते सरकार पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करेल, मात्र पडद्यामागुन बरेच काही घडत होते, शिजत होते, त्याची परिणती जुन २०२२ मधे विधानपरिषदेची निवडणूक झाली आणि संध्याकाळी निकाल जाहीर होताच, ऐकनाथ शिंदे आपल्या सतरा अठरा आमदारांना घेऊन सुरतेला निघाले, त्यावेळी भाजपने या घडामोडींशी आपला काही संबध नाही असे जाहीर केले, कालांतराने शिंदेंना जवळपास ४०-४५ आमदारांची साथ मिळाली, मग शिंदे आणि त्यांचे साथीदार सुरत, गोवाहाटी, गोवा करत महाराष्ट्रात परतले ते भाजप बरोबर सत्ता स्थापन करण्याच्या तयारीनेच. एव्हाना या सगळ्या घडामोडीं मागचे कलाकार कोण हे स्पष्ट झाले. नवीन सरकारच्या शपथविधी च्या वेळी महाराष्ट्राला आणखी एक धक्का बसला, देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री होणार हे स्पष्ट असतांना त्यांनीच मुख्यमंत्री शिंदे हे होणार आणि मी सरकारचा भाग रहाणार नाही असे जाहीर केले, मात्र लगेचच दिल्लिश्वरांनी आदेश दिला आणि ते ऊपमुख्यमंत्री झाले. सरकारला स्पष्ट बहूमत असतांना देखील जुन २०२३ मधे पुन्हा एकदा दे धक्का करत अजितदादा त्यांच्या अनेक सहकाऱ्यांना सोबत घेऊन राष्ट्रवादीतुन बाहेर पडले आणि शिंदे सरकार मधे सामील होत ऊपमुख्यमंत्री बनले. तीन तीघाडा काम बिघाडा होईल असे वाटत असतानाच महायुती सरकारने आपला ऊर्वरित कार्यकाळ




पूर्ण केला, मविआ देखील अभेद्य राहिली, आणि वैशिष्ट्यपूर्ण घडामोडींनी १४ व्या विधानसभेचा कार्यकाळ संपला, मात्र या काळात देशाच्या आणि राज्याच्या राजकारणात वेगळेच चित्र निर्माण केले आहेत, अनेक प्रश्न देखील ऊपस्थित झाले आहे.

२०१९ च्या निवडणुकीपुर्वी सभागृहातील शेवटच्या भाषणात तात्कालिक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठ्या आत्मविश्वासाने, आवेशाने 'मी पुन्हा येईन' ची घोषणा केली होती, २०१९ च्या निकालानंतर ते मुख्यमंत्री होणार हे स्पष्टच होते मात्र घडले भलतेच.

'मविआ' चे सरकार स्थापन झाले, पहिल्यांदाच विधानपरिषदेवर निवडुन गेलेले ऊद्धव ठाकरे मुख्यमंत्री बनले तर पहिल्यांदाच आमदार झालेले त्यांचे पुत्र कॅबिनेट मंत्री बनले.

देवेंद्र फडणवीस यांनी याच विधानसभेच्या कार्यकाळात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, विरोधी पक्षनेते अशा भुमिका बजावल्या.

तत्कालीन विधानसभा अध्यक्ष नाना पटोले यांनी अनपेक्षितपणे विधानसभा अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आणि २०२२ च्या सत्तांतरात त्यांची भुमिका महत्त्वाची ठरली असती.

राज्यपाल नियुक्त बारा आमदारांच्या नियुक्ती विधानसभेचा कार्यकाळ संपला देखील होऊ शकल्या नाहीत.

पाच वर्षाच्या काळात तीन वेगवेगळी सरकारे बनली मात्र अजितदादा हे तीनही सरकारांमधे ऊपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री राहिले.

भाजप ऊद्धव ठाकरे वितुष्ट टोकाला गेले.

या विधानसभेच्या कार्यकाळच तत्कालीन राज्यपाल, विधानसभा अध्यक्ष यांच्यावर सर्वोच न्यायव्यवस्थेने कठोर भाष्य केले.

शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फुटल्यानंतर निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवरच मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले, निवडणुक आयोगाने केवळ आमदार खासदार यांची संख्या त्यांना मिळालेली मते याचाच आधार घेऊन पक्ष आणि चिन्ह तसेच नाव मुळ पक्षातुन बाहेर पडणाऱ्यांना देण्याच्या निर्णयाने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत, पक्षाचे संघटन, घटना, निवडणुक आयोगाकडे नोंदणी, सभासद या बाबत निवडणूक आयोगाने कुठलाच विचार केला नाही आणि त्याचाच आधार घेत विधानसभा अध्यक्षांनी देखील निर्णय घेतला. मात्र दोन पक्षात फुटुन पडुन देखील कोणालाही अपात्र न ठरविण्याचा निकाल सर्वार्थाने आश्चर्यकारक ठरला.

पक्षांतरा बाबतचा कायदा, कालांतराने त्यात झालेली दुरुस्ती, दहावे परिशिष्ट याचा कुठेच विचार केला गेला नाही. पक्षांतर बंदी कायद्याचे गांभीर्यच राहिले नाही, हा कायदा कुचकामी ठरत असेल तर तो हवा कि नको याचा विचार होणे गरजेचे आहे.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे ज्या सर्वोच्च न्यायालयावर न्यायदानाबरोबरच घटनेच्या संरक्षणाची देखील जबाबदारी आहे त्या सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्रातील ऐतिहासिक घडामोडींनंतर तीन सर न्यायाधीश होऊन गेले, नुकतेच निवृत्त झालेले सर न्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांना तर दोन वर्षांहुन अधिक काळ मिळाला, ते महाराष्ट्रातीलच मात्र ते सेवा निवृत्त होऊन देखील ना आमदारांच्या अपात्रतेसारखा महत्त्वाचा मुद्दा निकाली निघु शकला ना पक्ष चिन्ह, पक्षाचे नाव, ना पक्ष कुणाचा याचा निर्णय लागू शकला. यामुळेच सर्वोच्च न्यायालयाने घटनाबाह्य ठरवलेल्या महायुती सरकारने आपला कार्यकाळ पूर्ण केला तो याच विधानसभेच्या कार्यकाळातच.

सत्तांतरानंतर याच विधानसभेत पचास खोके एकदम ओके, काय ती झाडी, काय तो डोंगुर, काय ते हाटेल असे वाक्प्रचार गाजले.

सर्वात विशेष म्हणजे याच विधानसभेच्या कार्यकाळातच भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना या प्रमुख पक्षांना आलटून पालटून सत्तेची संधी मिळाली.

अशा एक ना अनेक घटनांनी मावळतीला विधानसभा गाजली आणि या कार्यकाळात देशाच्या राजकारणात, सत्ताकारणात दिर्घकाळ बरे वाईट परिणाम होऊ शकतात. याच निमित्ताने घटनात्मक पदे, संस्था यांच्या वर बसणाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर आणि विश्वासार्हततेवरच मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

देशात पुरोगामी म्हणून ओळखल्या महाराष्ट्रातील मावळत्या विधानसभेत हे सगळे काही घडले आणि आपला एक वेगळाच ठसा उमटविला आहे.

**अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

# पंढरपूर येथील श्री विठ्ठल कारखाना ४३ वा गळीत हंगामाचा थाटात शुभारंभ

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२२, पंढरपूर :** श्री विठ्ठल सह. साखर कारखान्याचा सन २०२४-२५ गळीत हंगामाचा ४३ वा गळीत हंगाम शुभारंभ बुधवार दिनांक २१.११.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता या शुभसमयी ह.भ.प.श्री किरण बोधले महाराज, श्री संत माणकोजी महाराजांचे वंशज, श्री क्षेत्र पंढरपूर यांचे शुभहस्ते व डीव्हीपी उद्योग समुहाचे कार्यकारी संचालक अमर पाटील, स्वेरी कॉलेज संस्थापक सचिव डॉ. बी.पी. रोंगे सर व कारखान्याच्या व्हाईस चेअरमन सौ. प्रेम लताताई रोंगे मॅडम यांचे उपस्थितीत कारखाना कार्यस्थळावर संपन्न झाला.

सदर कार्यक्रम प्रसंगी कारखान्याचे कार्यकारी संचालक रविंद्र पाटील हे प्रास्ताविकपर भाषणात बोलताना म्हणाले की, या गळीत



हंगामात कारखान्याकडे ४०१४५ एकर ऊसाची नोंद झालेली असून त्यामधुन १२.१० लाख मे.टन ऊसाचे गाळप होईल. ऊस उत्पादक सभासद व शेतकरी यांच्या ऊसाचे वेळेत गाळप होणेसाठी कारखान्याने पुरेशी ऊस तोडणी वाहतुक यंत्रणा उभी केलेली आहे.

सदर प्रसंगी बोलताना कारखान्याचे संचालक तुकाराम मस्के सर म्हणाले की, आपल्या कारखान्यास कै. औदुंबर आण्णा पाटील यांना अभिप्रेत असलेला चेअरमन मिळालेला असल्यामूळे अभिजीत आबा पाटील यांच्या नेतृत्वात या कारखान्यास गतवैभव प्राप्त होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी ह.भ.प. किरण बोधले महाराज हे आपल्या अध्यात्मिक शैलीमध्ये विचार व्यक्त करताना म्हणाले की, श्री विठ्ठल कारखान्यामागे फार मोठी आध्यात्मिक शक्ती असून श्री विठ्ठल कारखान्याला अनेक साधू संताचे आशिर्वाद लाभले आहेत. कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील हे जनतेचे प्रश्न सोडविणेसाठी सतत प्रयत्नशिल असून त्यांचे मार्गदर्शनाखाली कारखाना निश्चित प्रगतीपथावर राहील, असे ते म्हणाले व पुढील गळीत हंगाम यशस्वी होणेसाठी शुभेच्छा दिल्या.

## मुलगी...

माझं भाग्य किती मोठं
जन्मली तू माझ्या घरी
माझ्या अंगणातील तुळस
माझ्या घराची तू परी...

तुझी इटुकलीशी पाऊल
माझ्या घरामध्ये पडली
जणू अंगणातील तुळस
आनंदाने डोलू लागली...

हि देणगीच म्हणावी
ईश्वराने मला दिली
आज म्हणून मला सर्वत्र
आई हि प्रसिद्धि मिळाली...

देवा आभाळगत कृपा
तुम्ही माझ्यावर केली
माझीच मुर्ती पुन्हा
मला घडविण्यास दिली...

**कु.हेमा रांबाडे. (मुर्तवडे) चिपळूण**

## आकडे..

काय लागे निकाल
पहा धागधूक वाढे
हतबध्द झाले कसे
सारे अभ्यास गाढे

एक्झिटपोलगोंधळे
उलटसुलट आकडे
काय गणित मांडावे
अभ्यास तंत्र तोकडे

वर्तवता अंदाजएक
नेमके घडते वाकडे
बेवरवसा जन मना
मळभ सगळी कडे

भरोसा नाही कुणा
समस्त चॅनल उघडे
चूककरतात अचूक
समीकरण रे बिघडे

रचले इमले चांगले
क्षणभरा ते गडगडे
सागावे कारण काय
मुके बनले बड बडे

जनतेचा कौल असा
बंद पाडले ते चौघडे
शक्ती दावी मतदाता
फक्त इथेचं असे घडे

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# शिर्डीच्या साईबाबांचे अवतार ?

**शिर्डीच्या साईबाबांचे अवतार मानले जाणारे सत्य साईबाबा यांची यंदा ९६वी जयंती आहे. दि.२३ नोव्हेंबर १९२६ रोजी त्यांचा पुट्टपर्थी या शहरात जन्म झाला. दरवर्षी त्यांच्या जयंती उत्सवाच्या निमित्त पुट्टपर्थी शहरात तसेच जगभरातील अनेक ठिकाणी त्यांचे भक्त हा आनंद साजरा करतात.**

यंदा सुद्धा पारंपरिक रथोत्सव आणि वीणा पठण या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असेलच. २३ नोव्हेंबर रोजी या कार्यक्रमाचा समारोप मंत्री महोदयांच्या हस्ते होत असतो. वयाच्या चौदाव्या वर्षी त्यांनी स्वतःला साईबाबांचे अवतार म्हणून घोषित केले होते. त्यानंतर आपल्या अनुयायांचा मोठा वर्ग निर्माण करून त्यांनाही हाच विश्वास पटवून दिला होता. आपल्या हयातीत त्यांनी आध्यात्मिक, सामाजिक व वैद्यकीय क्षेत्रात भरीव कार्य करून जगातील १२६ देशांमध्ये बाराशे सत्य साईबाबा केंद्र स्थापन करण्याचे मोठे काम केले आहे.

सत्य साईबाबा यांनी आपल्या हयातीत अनेक चमत्कार केल्याचे म्हंटले जाते. म्हणूनच त्यांना काही वेळा सुपर ह्युमन म्हणून देखील संबोधले जात होते. लोकांमध्ये फिरताना आपले चमत्कार दाखवत. कधी बहुमूल्य हार, अंगठी, दागिने किंवा अंगारा असे सगळे जादुई पद्धतीने प्रस्तुत करणे अनेकदा चर्चेच्या गर्तेत आले होते. यावरूनच त्यांना टीकेचा देखील सामना करावा लागला होता. सन १९४४मध्ये सत्य साईबाबा यांनी पुट्टपर्थी येथील गावकऱ्यांसाठी एका मंदिराची उभारणी केली. आध्यात्मिक बाबींच्या सोबतच सामाजिक कार्यात देखील सत्य साई



बाबांचा मोलाचा वाटा होता. मोफत हॉस्पिटल, क्लिनिक, पाणपोई, ऑडिटोरियम, आश्रम, शाळा इत्यादींची बांधणी करून त्यांचा गोरगरिबांना वापर करायला दिला. त्यामुळे अनेकदा त्यांना देवाचे रूप मानले जात होते.

सत्य साईबाबा यांचे मूळनाव सत्यनारायण राजू असे असून सन १९२६ साली पुट्टपर्थी येथील एका गरीब हिंदू घरात त्यांचा जन्म झाला होता. आई- वडील, तीन भाऊ आणि दोन बहिणी असा त्यांचा परिवार होता. लोकांच्या म्हणण्यानुसार सत्य साईबाबा यांचा जन्म ढेकळली चमत्कारिक वातावरणात झाला होता. त्यांच्या जन्माच्या वेळी अचानक घरात वाद्य वाजू लागली होती. जेव्हा सत्यनारायण हे तेरा वर्षाचे होते तेव्हा एका विंचवाने त्यांना दंश केला होता. त्यानंतर काही तास ते पूर्णतः कोमात होते. काही तासांनी त्यांना शुद्ध आली.

तेव्हा मात्र त्यांचे वर्तन पूर्णतः बदलले होते. त्यांनी अचानक संस्कृतमध्ये गाणी गाण्यास सुरुवात केली. तर त्यांचे शरीरही आधीपेक्षा किंचित अधिक कठोर झाले होते. या प्रकरणात त्यांच्यावर उपचार करण्यात स्थानिक डॉक्टरांना देखील यश आले नाही, असे म्हटले जाते. या घटनेनंतर एके दिवशी त्यांनी चॉकलेट आणि गुलाबाची फुले अशा भेटवस्तू बनवून वाटण्यास सुरुवात केली. त्यामुळे यामागील कारण त्यांना विचारण्यात आले. त्यांनी आपण साईबाबांचे अवतार असल्याचे सर्वांना सांगितले. तसेच त्याच क्षणी स्वतःच्या नावापुढे त्यांनी साई हा शब्द देखील जोडून घेतला. लोकांच्या विचारसरणीत सनातन धर्माची विचारधारा समाविष्ट करण्यात त्यांना यश आले होते.

इ.स.१९६३मध्ये सत्य साईबाबा यांना तब्बल चार वेळा हृदयविकाराचे झटके आले होते. मात्र काही काळाने त्यांच्या प्रकृतीमध्ये स्थैर्य आले होते. यानंतर त्यांनी एका प्रवचनातून आपला मृत्यू झाला तरी कर्नाटकात आपण प्रेमा साईंबाबा यांच्या रूपात पुन्हा जन्म घेऊ, असा दावा केला होता. सन २०११ साली मार्चमध्ये सत्य साईबाबा यांना श्वसनात त्रास होऊ लागल्यावर पुट्टपर्थी येथील शांतिग्राम श्री सत्य साई सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये त्यांना दाखल करण्यात आले होते. यानंतर एकाच महिन्यात त्यांची अवस्था आणखीच बिकट झाली. ते दि.२४ एप्रिल २०११ रोजी वयाच्या ८५व्या वर्षी अनंतात विलीन झाले.

**!! पावन जयंती पर्वावर त्यांना विनम्र अभिवादन !!**

**- संत चरणधूळ : बापू- श्रीकृष्णदास निरंकारी.**
**मु. पो. ता. जि. गडचिरोली.**
**व्हा. नं. ७४१४९८३३३९.**


This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# माढा मतदारसंघात आमदार कोण ? गावा-गावात लागल्या पैजा !

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२२, पंढरपूर :** राज्यात अतिशय चर्चेत राहिलेल्या माढा विधानसभा मतदारसंघात सत्ताधारी अपक्ष उमेदवार विजयी होणार की नविन इतिहास घडणार याची सर्वांनाच उत्सुकता लागून राहिली आहे.

प्रत्येक पक्षाचा पदाधिकारी व कार्यकर्ता आपलाच नेता कसा निवडून येणार याचा दावा करत गोळा-बेरीज करण्यात गुंतला आहे. गत महिनाभर मतदारसंघात घडलेल्या घडामोडी पाहता पुन्हा प्रस्थापित निवडून येणार की महाविकास आघाडीच्या विजयाची तुतारी वाजणार ? याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

माढा विधानसभा मतदारसंघात अपक्षसह महायुती आणि महाविकास आघाडी या प्रमुख ३ उमेदवारांमध्ये लढत झाली आहे. यामध्ये विद्यमान आमदार बबनदादा शिंदे यांचे पुत्र रणजितसिंह शिंदे अपक्ष, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे मीनल साठे, महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून अभीजीत पाटील यांच्यात प्रमुख लढत झाली.



यासह ईतर पक्षासह अपक्ष उमेदवार ही निवडणूक रिंगणात होते. या सर्व उमेदवारांचे नशिब बुधवारी (दि.२०) इव्हीएम मशिनमध्ये बंद झाले. मतदाराजा कोणाला पास करणार हे आज (दि. २३) कळणार आहे. बुधवारी संध्याकाळी मतदानाची वेळ संपल्यापासून तर्क वितर्कांना ऊत आला. माझाच नेता कसा जिंकणार यावरुन जेवणापासून ते लाखो रुपयांच्या पैजा लावल्या जात आहेत. काही महिन्यापूर्वी पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत मतदारांनी दाखविलेला स्वयं स्फूर्ती उत्साह या विधानसभा निवडणूकीतही दिसून आला.

परंतु अनेक मतदान केंद्रावर अखेरच्या सत्रात लक्ष्मी दर्शन घडविल्यानंतरच मतदारांच्या रांगाच्या रांगा लागल्या होत्या. मतदानाची वेळ संपल्यानंतर देखील रात्री उशिरापर्यंत अनेक मतदान केंद्रावर मतदान सुरू होते.

सर्वच पक्षांच्या कार्यकर्त्यांच्या निर्माण झालेली ईर्षा, निवडणूक विभागामार्फत राबवलेली जनजागृती, सोशल मिडीयावरून झळकलेले विविध संदेश आदींच्या प्रभावामुळे टक्केवारी वाढेल, अशी अपेक्षा होती. परंतु २०१९ च्या विधानसभा निवडणूकीपेक्षा काही टक्क्याने मताची आकडेवारी वाढली. मागील १० वर्षाच्या निवडणुकीची गणिते पाहता यंदाची निवडणूक थोडी वेगळी आहे. महाविकास, महायुती, अपक्ष असे तीन प्रकारची झेंडे हाती घेतल्यानंतरची ही निवडणूक माढ्यात राजकारणाला वेगळीच कलाटणी देणारी ठरणार आहे.

**अभिजित पाटील पहिल्यांदाच विधानसभेच्या रिंगणात**

मागील निवडणुकीत या मतदारसंघात राष्ट्रवादीकडून निवडणूक बबनदादा शिंदे यांनी निवडणूक न लढविण्याचा निर्णय घेत त्यांनी आपले पुत्र रणजितसिंह शिंदे यांचेसाठी तुतारी चिन्हासाठी आग्रह धरला होता.

मात्र ऐनवेळी शरद पवार यांनी त्यांना डावलल्याने त्यांनी अपक्ष निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. तर शरद पवार यांचे निकटवर्तीय अभिजित पाटील यांना तुतारी चिन्हावर उमेदवारी मिळाल्याने राष्ट्रवादी काँग्रेस (श प ) पक्षाला पाटील यांच्या माध्यमातून तगडा चेहरा लाभला आहे. यंदाच्या निवडणूकीत पहिल्यांदाच विधानसभेच्या आखाड्यात अभिजित पाटील उतरले आहेत.

# पारनेर, शेवगाव, श्रीगोंदा, कर्जत-जामखेड, राहुरी, अकोले, श्रीरामपूरचा निकाल लांबणार

## मतमोजणीच्या होणार २२ ते २६ फेर्या, अन्य मतदारसंघांत १९ ते २१ राऊंड




**मतमोजणी केंद्राचे ठिकाण मतदारसंघ – मतमोजणी अकोले- तहसील कार्यालय नविन इमारत संगमनेर - भाऊसाहेब संतुजी थोरात क्रीडा संकुल पारनेर - औद्योगिक प्रशिक्षण संस्था शिर्डी - प्रशासकीय इमारत, तहसील कार्यालय, राहाता कोपरगाव - सोवा निकेतन कॉन्व्हेंट स्कूल श्रीरामपूर - मध्यवर्ती प्रशासकीय इमारत तहसील कार्यालय नेवासा - न्यू गव्हरमेंन्ट ग्रेन गोडाऊन, मुकुंदपुरा शेवगाव - शासकीय इमारत तहसील कार्यालय राहुरी - रामदास पाटील धुमाळ न्यू आर्टस कलेज शीगोंदा - गव्हरमेंन्ट ग्रेन गोडाऊन,पेडेगाव रोड कर्जत जामखेड - दादा पाटील महाविद्यालयल**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२२, अहिल्यानगर :** विधानसभा निवडणुकीसाठी मतदान झाले असून शनिवार, दिनांक २३ नोव्हेंबर रोजी जिल्ह्यातील १२ मतदारसंघांची मतमोजणी होणार आहे.

साधारण एका मतदारसंघासाठी १०० ते १५० कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून या सर्वांना आज (शुक्रवारी) मतमोजणीचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. दरम्यान, जिल्ह्यात मतदान केंद्राच्या संख्येनूसार मतदानाच्या फेर्या ठरणार असून प्रत्येक ठिकाणी मोजणीसाठी १४ टेबलची व्यवस्था करण्यात आली आहे. एकावेळी १४ टेबलची मोजणी पूर्ण झाल्यावर मोजणीचा एक राऊंड होणार आहे.

जिल्ह्यात सर्वाधिक मतमोजणीच्या फेर्या या शेवगाव आणि पारनेर तालुक्यात प्रत्येकी २६ अशा होणार आहेत. तर शीगोंदा आणि कर्जत-जामखेड प्रत्येकी २५ फेर्या होणार असून राहुरी, श्रीरामपूर आणि अकोले मतदारसंघात प्रत्येकी २२ फेर्या होणार आहेत. जिल्ह्यात सर्वाधिक मतमोजणीसाठी वेळ या चार मतदारसंघांत लागणार आहे. उर्वरितमध्ये नगर शहरात २१ फेर्या, संगमनेर २१

फेर्या, नेवासा २० फेर्या तर शिर्डी आणि कोपरगाव मतदारसंघात प्रत्येकी १९ फेर्या होणार आहेत.

जिल्ह्यात प्रत्येक मतदान केंद्रात मतमोजणीसाठी प्रत्येकी १४ डेबल लावण्यात येणार आहेत. यासह सैनिक व पोस्टल मतांच्या मोजणीसाठी स्वतंत्र टेबल असणार आहेत.

प्रत्येक ठिकाणच्या मतमोजणीसाठी १०० ते १५० कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. या कर्मचार्यांना आज मोजणीबाबतचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सकाळी ८ वाजता मतमोजणी सुरू करण्यात येणार असून साधारणपणे दहाव्या फेरीपासून निकालाचा प्राथमिक कल हाती येणार आहे.

# उमेदवारांच्या वाढल्या ज्योतिष्यांकडे चकरा...

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२२, अहिल्यानगर :** राजकारणात वावरणारे बहुतांश लोक निवडणुकीत तिकिटासाठी धडपडत असतात. तिकीट मिळाल्यानंतर निवडून येणार का, ही विवंचना असते. जिंकल्यानंतर मंत्रीपदाची लालसा असते. या सर्व प्रश्नांची उत्तरे निकालाआधीच मिळण्याच्या आशेने उमेदवार ज्योतिषांकडे चकरा मारतात. सध्या उमेदवारांच्या ज्योतिष्यांकडील चकरा वाढलेल्या दिसत आहेत.

अनेक प्रश्नांची उत्तरे जाणून घेण्यासाठी उमेदवारांची पावले हळूहळू ज्योतिष्यांकडे वळू लागली आहेत. लढत अधिक चुरशीची होणार असल्याने आपण निवडून येऊ का ? याची चिंता राज्यासह जिल्ह्यातील उमेदवारांना भेडसावू लागली आहे.

सर्वपक्षीय उमेदवारांचे भवितव्य बुधवारी मतपेटीमध्ये बंद झाले आहे. मतदारांचा कौल नक्की कुणाकडे, याबाबतचा अंदाज सध्यातरी कुणालाच बांधता येत नाही. अशी स्थिती आहे. शेवटच्या दोन दिवसांत चित्र काही ठिकाणी निवडणुकीचे चित्र पालटले अशी जिल्ह्यातील काही मतदारसंघात अशी स्थिती आहे.

त्यामुळे माझ्या ग्रहांची दिशा निवडणूक जिंकण्यासाठी अनुकूल आहे की नाही, हे जाणून घेण्यासाठी उमेदवारांच्या ज्योतिष्यांकडील चकरा सुरू झाल्या आहेत. अगदी निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्यापासून तिकीट वाटप झाल्यानंतर उमेदवारांनी अर्ज दाखल करण्यासह, प्रचार कधी सुरू करायचा, यासाठी ज्योतिष्यांचे सल्ले घेतले जात होते. नेत्यांना त्यांच्या राजकीय कारकीर्दीत येणाऱ्या अडचणी किंवा यशाबद्दल अंदाज हवा असतो.

त्यासाठी कुंडलीचा अभ्यास केला जातो. बऱ्याच नेत्यांना वाईट नजर, शत्रुत्व किंवा राजकीय अडथळ्यांपासून बचावासाठी ज्योतिष्यांकडून रत्न, मंत्र किंवा हवन करण्याचा सल्ला दिला जातो. लोकांना नेत्यांची धार्मिक आणि आध्यात्मिक बाजू दाखवण्याचा हा एक मार्ग असतो. यातून त्या नेत्यांबद्दल लोकांमध्ये श्रद्धा आणि विश्वास निर्माण होतो.

राजकारणात नव्याने पदार्पण करणारे नेते अनेकदा ज्योतिष्यांचा सल्ला घेऊनच राजकारणात आपली पावले टाकत असतात.

# मतमोजणी कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण

## अचुक, पारदर्शक प्रक्रिया राबविण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, छत्रपती संभाजीनगर :** विधानसभा निवडणूक २०२४ करीता शनिवार, दि.२३ रोजी मतमोजणी होणार आहे. त्यासाठी शुक्रवार, दिनांक २२ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.

या प्रशिक्षणाला जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दुरदृष्यप्रणालीद्वारे मार्गदर्शन केले. जिल्हाधिकारी कार्यालयातून आयोजित या प्रशिक्षणात त्या त्या विधानसभा क्षेत्रात मतमोजणी कर्मचारी, निवडणूक निर्णय अधिकारी आदी सहभागी झाले होते. जिल्हा मुख्यालयातून जिल्हाधिकारी दिलीप




स्वामी यांच्यासह अपर जिल्हाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे, टपाली मतपत्रिका नोडल अधिकारी प्रभोदय मुळे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी स्वामी यांनी मार्गदर्शन केले की, मतमोजणी साठी नियुक्त सर्व कर्मचाऱ्यांनी वेळेच्या आधी मतमोजणी केंद्रावर उपस्थित रहावे. मतदान यंत्रे स्ट्राँगरुम मधून बाहेर आणण्याआधी कुलूप सिल उघडतांना निवडणूक निरीक्षक, उमेदवारांचे प्रतिनिधी उपस्थित असणे आवश्यक आहे. या प्रक्रियेचे व्हिडीओ चित्रण करणे आवश्यक आहे. त्यामुळे आवश्यक ती पारदर्शकता जपता येते.

मतमोजणी केंद्रावरील संवाद प्रणाली ही अद्यावत व सुसज्ज ठेवावी. विद्युत पुरवठा अखंड ठेवण्याबाबत वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांचे पथक सज्ज ठेवावे. मतमोजणीबाबत निवडणूक आयोगाने दिलेल्या तरतूदींचा अभ्यास करा. मतमोजणी कक्षात शांतता राखायला हवी. टपाली मतपत्रिकांची मतमोजणीने सुरुवात करा. मतमोजणी केंद्रावर अद्यावत आरोग्य केंद्र सुसज्ज ठेवा. मतमोजणी केंद्रात केवळ निवडणूक आयोगाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांनाच मोबाईल नेता येणार आहे. त्याव्यतिरिक्त कुणालाही मोबाईल नेता येणार नाही. मतमोजणी केंद्राबाहेर त्रिस्तरीय सुरक्षा बंदोबस्त राहील. १०० मीटर कक्षेच्या आत वाहनांना परवानगी नाही. याबाबत दक्षता घ्यावी.

मतमोजणी प्रक्रिया अचूक व पारदर्शक पद्धतीने राबवावी,असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले. उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके व प्रभोदय मुळे यांनीही मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणानंतर प्रत्येक विधानसभा मतदार संघात नियुक्त कर्मचाऱ्यांचे स्थानिक पातळीवर प्रशिक्षण सुरु करण्यात आले.

# थोडक्यात

## महिला पोलीस विश्रामिका एक स्तुत्य उपक्रम

### पोलीस आयुक्तांनी महिला पोलिसांना दिले सप्रेम भेट




**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.२२, कल्याण (ठाणे) :** पोलीस आयुक्त ठाणे शहर यांच्या वतीने एक नवीन उपक्रम सुरू करण्यात आले त्या उपक्रमाचे नाव आहे. महिला पोलीस विश्रामिका. पोलीस दलातील महिला पोलीस हे पुरुषांसोबत खांद्याला खांद्या लावून अहो रात्री काम करत असतात. अनेक मोठे बंदोबस्त, महत्त्वाचे कार्यक्रम, अतिमहत्त्वाचे व्यक्तीची सभा जत्रा सत्संग आणि धार्मिक सणांचे बंदोबस्त इत्यादी कर्तव्य पार पडत असताना पुरुषांन प्रमाणे महिला पोलीस तितक्याच खंबीरपणे उभे असतात. त्यासाठी तासनतास एका जागेवर उभे राहून कर्तव्य पार पाडावी लागत असतात. मात्र अशावेळी महिला पोलिसांना नैसर्गिक विधी पार पडण्यासाठी अडचणीचा समोर जावं लागते व त्याच्यामुळे त्यांचा शरीरावर विपरीत परिणाम होत असतो. यावर उपाय म्हणून नुकताच आशितोष डुंबरे पोलीस आयुक्त ठाणे शहर यांच्या संकल्पनेतून महिला पोलीस विश्रामिका या नावाचे फिरती व्हेन कार्यान्वित करण्यात आली. सदर विश्रामिका टाटा ७०९ या वाहनाचा वापर करून तयार करण्यात आली असून तिच्यामध्ये महिला पोलीसांना त्या कर्तव्य वाजवत असताना नैसर्गिक विधी करण्यासाठी लहान बाळांच्या स्तनपान करण्यासाठी, कपडे चेंजिंग रूम तसेच काही वेळ विश्रांती करण्यासाठी एक बाथरूम, २ वॉश बेसिन, २ चेंजिंग रूम व सोपा कम बेड अशी व्यवस्था करण्यात आली आहे. सदर विसरेमिकेवर महिला पोलीस वाहन चालक आणि एक महिला अंमलदार असे पूर्णवेळ नेमण्यात आले आहे.

सदर महिला पोलीस विश्रामिका या उपक्रम अंतर्गत सध्या प्रायोगिक तत्त्वावर एक वाहन तयार करण्यात आले आहेत. सदर महिला पोलीस विश्रामिका वाहनांची उपयुक्तता पाहून प्रत्येक जोन मध्ये एक विश्रामिका सुरू करण्याचा पोलीस आयुक्त ठाणे शहर यांचे मानस आहे. सदर विश्रामिकाचे संपूर्ण डिझाईन सनवा मोटर्स प्रायव्हेट लिमिटेड यांनी केलीली असून एचडीएफसी बँकेचे सहकार्य प्राप्त झाले आहे.

## बॅनर्स, होर्डिंग हटविण्यासाठी पालिकेची विशेष मोहीम

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२२, नवी मुंबई :** न्यायालयाने दि.९ ऑक्टोबर रोजीच्या जनहित याचिका क्र. १५५/२०२११ बाबत दिलेल्या आदेशान्वये नवी मुंबई महानगर पालिका क्षेत्रातील अनधिकृत बॅनर्स / होर्डींग्ज हटविण्याची विशेष मोहीम दिनांक २५ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर २०२४ या कालावधीत सर्वच आठही विभागांच्या कार्यक्षेत्रात राबविण्यात येणार आहे. या मोहीमेंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील परवानगी न घेतलेले तसेच परवानगी संपुष्टात आलेले अनधिकृत बॅनर्स / होर्डिंग्ज हटविण्यात येणार असून निष्कासन खर्चासाठी आलेली दंडात्मक रक्कम संबंधितांकडून वसूल करण्यात येणार आहे. महाराष्ट्र मालमत्तेच्या विरूपणास प्रतिबंध करण्याकरिता अधिनियम १९९५ अन्वये अशाप्रकारे सार्वजनिक ठिकाणी विनापरवागी अनधिकृतरित्या होर्डींग / बॅनर लावणे हे शहर सौंदर्यीकरणाला बाधा पोहचविणारे असून या मोहीमेनंतरच्या कालावधीत विनापरवानगी होर्डींग / बॅनर लावण्यात येऊ नयेत असे सूचित करण्यात येत आहे. अन्यथा सदर अधिनियमाद्वारे संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याची कारवाई करण्यात येईल यांची नोंद घेण्यात यावी. याविषयी कोणत्याही नागरिकास सूचना / तक्रार करावयाची असल्यास संबंधित विभाग कार्यालयात अथवा महानगरपालिकेच्या वेबसाईटवरील ग्रिव्हेन्स रिड्रेसल पोर्टलवर अथवा चू छचचउ या नवी मुंबई महानगरपालिकेच्या ॲपवर अथवा ८४२२९५५९१२ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर नागरिक आपली तक्रार / सूचना नोंदवू शकतात. तरी नवी मुंबईकर नागरिकांनी आपल्या शहराचा स्वच्छ व सुंदर शहर हा नावलौकिक टिकविण्यासाठी व वृद्धिंगत करण्यासाठी शहर विद्रुपीकरणाला प्रतिबंध घालण्यासाठी संपूर्ण सहकार्य करावे असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## महिला काँग्रेस प्रदेश उपाध्यक्षा डॉ.रेखाताई चव्हाण यांनी बजावला मतदानाचा हक्क

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, हदगाव (नांदेड) :** हिमायतनगर मतदारसंघांमध्ये होत असलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांमध्ये महायुतीचे उमेदवार बाबुराव कदम कोहळीकर व महाविकास आघाडीचे उमेदवार माधवराव पाटील जवळगावकर यांच्यामध्ये प्रामुख्याने चुरशीची लढत पाहायला मिळाली आहे. दिनांक २० नोव्हेंबर २०२४ रोजी हदगाव तालुक्यातील मौजे गार्लेगाव येथे महाराष्ट्र काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष डॉक्टर रेखाताई चव्हाण यांनी त्यांच्या संपूर्ण परिवारासहित उपस्थित राहून मतदान केले. मौजे गोर्लेगाव येथे एकूण मतदानाची टक्केवारी ७७.३८ राहिली आहे. एकूण १६१४ पैकी १२४९ लोकांनी आपला मतदानाचा हक्क बजावला आहे. येथे बूथ क्रमांक ६६ वर पुरुष ३६१ व महिला ३०९ असे एकूण ६७० व बूथ क्रमांक ६७ वर पुरुष ३०२ व महिला २७७ असे एकूण ५७९ मतदान झाले आहे. आणि सर्व बूथ वरील मिळून आज दिवस अखेर झालेले मतदान १२४९ आहे.

## विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ निकालासाठी वेबसाईट

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२२, ठाणे :** ठाणे जिल्हा माहिती कार्यालयाकडून आपल्याला उद्या निकाल यासंबंधीची माहिती वेळोवेळी दिली जाणार आहे. तरीही महाराष्ट्र राज्यातील विधानसभेच्या निवडणुकीच्या निकाल पाहण्यासाठी मा.भारत निवडणूक आयोगाने https://results.eci.gov.in/index1.html ही वेबसाईट तयार केली आहे. निकालाच्या दिवशी म्हणजेच शनिवार, दि.२३ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ८ वाजेपासून ही वेबसाईट कार्यान्वित होणार आहे.

या वेबसाईटवर निकालाचे ट्रेंड व निकालाची माहिती रियल टाईममध्ये मिळणार आहे. तरी अधिकृत निकालासाठी सर्वांनी या वेबसाईटचा उपयोग करावा अशी विनंती ठाणे जिल्हा माहिती अधिकारी, मनोज सानप यांनी केली आहे.